# पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीची सुचना

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर

**मे. दिनानाथ अलाईड स्टिल मॅन्युफॅक्चरींग, प्रा.लि.,** प्लॉट नं. बी-3, एम.आय.डी.सी. मुल, ता. मुल, जि. चंद्रपूर यांनी त्यांच्या प्रस्तावित स्पॉंज आयर्नच्या 2,31,000 TPA उत्पादना करिता 2 x 350 TPD DRI प्लांट, 2,64,000 TPA बिलेट उत्पादनाकरिता CCM सह 2 X 350 प्रर्वतन भट्टी, 2,64,000 TPA TMT बार्स उत्पादनाकरिता रोलिंग मिल आणि AFBC वर आधारीत 32 मेगावॅट, WHRB वर आधारीत 19 मेगावॅट वीज प्रकल्प उभारण्याच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्याकरिता म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज सादर केला आहे. सदर प्रकल्पामुळे मुल तालुक्यातील चिखली, चिखली-1, चिखली-2, कन्हाळगाव चक, बेलाघाट-1, बेलाघाट-2 मोरवाही मुल, मोरवाही चक, टेकाडी, सदागड, कोसंबी, मरेगाव, राजगड, चिमडा व आकापूर चितेगाव, रोजोली ता. मुल, जि. चंद्रपूर ही गावे प्रभावित होणार आहेत.

सदरील प्रस्तावित प्रकल्पाकरिता भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि. 14 सप्टेंबर, 2006 च्या अधिनियमान्वये व दि. 01 डिसेंबर, 2009 च्या सुधारित अधिनियमान्वये उपरोक्त प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करण्यात येत आहे.

सदर जनसुनावणी पर्यावरण विषयक मुद्यांबाबत घेण्यात येत असून सदर नियोजित प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पासंबंधी टिका-टिप्पणी किंवा आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरुपात नोंदविता येईल.

सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत 30 दिवसांच्या आत खालील पत्त्यावर नोंदविण्यात याव्यात.

| प्रादेशिक कार्यालय | उप-प्रादेशिक कार्यालय |
|---|---|
| महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन,<br>पहिला माळा, बस स्टॅण्ड समोर, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर<br>फोन नं. 07172-251965<br>Email- rochandrapur@mpcb.gov.in | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन,<br>पहिला माळा, बस स्टॅण्ड समोर, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर<br>फोन नं. 07172-251965<br>Email - srochandrapur@mpcb.gov.in |

मौखिक किंवा लेखी आक्षेप जाहिर जनसुनावणीच्या वेळेस सुध्दा नोंदविता येईल. जाहिर जनसुनावणी खालील ठिकाणी घेण्यात येईल.

| | |
|---|---|
| दिनांक | : 07/05/2024 |
| वेळ | : सकाळी 11.00 वाजता |
| स्थळ | : प्रकल्प स्थळ, प्लॉट नं. बी-3, एम.आय.डी.सी. मुल, ता. मुल, जि. चंद्रपूर |
| वे-बॅक्स प मिटींग नंबर | : 2511 647 6386 |
| पासवर्ड | : 07052024 |

**Webex Meeting link**
**https://mpcb.webex.com/mpcb/j.php?MTID=ma65ff2315dc628d1068ff4f01882b542**

सदर प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक माहिती असलेले दस्तावेज खालील कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ति या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये सदर दस्तावेज अभ्यासु शकतील.

1) पर्यावरण विभाग, 15 वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - 400 032
2) सह-संचालक (जल प्रदुषण नियंत्रण) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईट, 2 रा व 4 था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई-400 022
3) प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरण व वातावरण बदल मंत्रालय, VCA समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
4) प्रादेशिक कार्यालय/उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर
5) जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर
6) जिल्हा परिषद, चंद्रपूर
7) जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर
8) उप-विभागीय कार्यालय, मुल, ता. मुल, जि. चंद्रपूर
9) तहसिल कार्यालय, मुल, ता. मुल, जि. चंद्रपूर
10) नगर परिषद कार्यालय, मुल, ता. मुल, जि. चंद्रपूर.
11) गट-ग्रामपंचायत कार्यालय, चिखली (चिखली-1, चिखली-2, कन्हाळगाव चक, बेलाघाट-1, बेलाघाट-2), ता. मुल, जि. चंद्रपूर.
12) गट-ग्रामपंचायत कार्यालय, मोरवाही मुल (मोरवाही मुल व मोरवाही चक), ता. मुल, जि. चंद्रपूर.
13) गट-ग्रामपंचायत कार्यालय, टेकाडी (टेकाडी व सदागड), ता. मुल, जि. चंद्रपूर.
14) ग्राम पंचायत कार्यालय, कोसंबी, ता. मुल, जि. चंद्रपूर.
15) ग्राम पंचायत कार्यालय, मरेगाव, ता. मुल, जि. चंद्रपूर.
16) ग्राम पंचायत कार्यालय, राजगड, ता. मुल, जि. चंद्रपूर.
17) ग्राम पंचायत कार्यालय, चिमडा, ता. मुल, जि. चंद्रपूर.
18) ग्राम पंचायत कार्यालय, आकापूर, ता. मुल, जि. चंद्रपूर.
19) ग्राम पंचायत कार्यालय, चितेगाव, ता. मुल, जि. चंद्रपूर.
20) ग्राम पंचायत कार्यालय, राजोली, ता. मुल, जि. चंद्रपूर.
21) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ - www.mpcb.gov.in

**स्वा/-**
**उप-प्रादेशिक अधिकारी**
**म.प्र.नि.मंडळ,**
**चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी.**